दिनांक २२/०६/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक पुनमसिंग बंकटसिंग डोंगरजाळ, वय ५७ वर्ष, तलाठी सजा पंढरपुर, जि.औरंगाबाद यांनी ५,०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे याचे नाव, हुद्दा | :- | पुनमसिंग बंकटसिंग डोंगरजाळ, वय ५७ वर्ष, तलाठी सजा पंढरपुर, जि.औरंगाबाद रा.मु.बेदवाडी, पोस्ट परसोडा, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | **पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.** |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या रो-हाऊसची सातबा-यावर फेरफार नोंद घेण्याकरीता |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | ग्रामपंचायत कार्यालय वळदगांव,ता.औरंगाबाद जि.औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांनी नवीन रो-हाउस खरेदी केला आहे. खरेदी केलेल्या रो-हाउसची सातबा-यावर फेरफार नोंद होण्याकरीता तलाठी पुनमसिंग डोंगरजाळ, सजा पंढरपुर ता. जि. औरंगाबाद यांची भेट घेतली. त्यावर तलाठी पुनमसिंग डोंगरजाळ यांनी तुमच्या सोसायटीतील सर्व रो-हाउसची सातबा-यावर फेरफार नोंद करुन देतो त्याकरीता प्रत्येकी ३०००/- रु मला द्यावे लागतील अशी लाचेची मागणी करीत असल्या बाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, तलाठी पुनमसिंग डोंगरजाळ, सजा पंढरपुर, ओरंगाबाद यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांचे २०००/- रुपये व सोसायटीत त्यांच्या शेजारी राहणारे इसम यांचे ३,०००/- रुपये असे दोघाचे मिळुन ५०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, पुनमसिंग बंकटसिंग डोंगरजाळ, तलाठी सजा पंढरपुर, जि.औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५,०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सातारा,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.श्री. मारुती पंडीत, पोलीस उपअधीक्षक बी.व्ही.गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी केली. त्यांना सदर सापळा कारवाईकामी पोलीस निरीक्षक श्री. हनुमंत वारे, पोना/सुनिल पाटील, बाळासाहेब राठोड, रविंद्र काळे, पो.अ.केवलसिंग घुसींगे, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

(रुपचंद म.वाघमारे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद